ISSN No-2231-5063 Vol.1,Issue.IX/March 2012;pp.1-4

**Research Paper**

# "पिंपरी चिंचवड (पुणे) येथील फळभाजीपाला बाजाराचा अव्यास"

प्रा. डॉ. विकास ज. पवार
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
सी.के. गोयल महाविद्यालय,
दापोडी, पुणे - १२

प्रस्तावना :–

भारतात विविध प्रकारच्या फळभाजीपाल्याचे उत्पादन होते. एकंदर शेती व्यवसायासाठी वापरल्या जाणा-या जमिनीच्या क्षेत्रपैकी ६.७ टक्के क्षेत्र फळभाजीपाला उत्पादनासाठी वापरले जाते. त्यामधुन सुमारे ९0 दशलक्ष टन फळभाजीपाल्यचे उत्पादन होते असा एक अंदाज आहे. फळभाजीपाला शेतक-यांना कमी वेळेत नगदी उत्पन्न मिळवून देणारा मार्ग आहे. याशिवाय फळभाजीपाला पीक घेण्याचा कालावधी कमी असल्यामुळे या पिकावर शेतकरी जास्त लक्ष केंद्रीत करत आहेत. फळभाजीपाला उत्पादनाचा व उत्पादनोत्तर व्यवहारांचा अभ्यास केलेल्या स्वामीनाथन समितीने असा अंदाज केला आहे की, एकूण फळभाज्यांच्या उत्पादनापैकी २५ टक्के उत्पादन हे ग्राहकाला पोहचेपर्यंत नष्ट होते. उत्पादन हाती आल्यानंतरची विपणन व्यवस्था योग्य नसल्याने ही हानी होते.

पिंपरी-चिंचवड शहराचा औद्योगिकरणामुळे मोठया प्रमाणात विस्तार झाला आहे. त्यामुळे या शहराची लोकसंख्या झपाटयाने वाढत आहे. या वाढत्या लोकसंख्येची फळभाजीपाल्याची गरज पूर्ण करण्याचे काम भाजीमंडईद्वारे केले जाते. भाजी मंडईत फळभाजीविक्री व्यवसाय करण्यासाठी प्रत्येक विक्रेत्याला परवाना घेणे क्रमप्राप्त ठरले. या शहरांमध्ये हा भाजीमंडईचा व्यवसाय मोठया प्रमाणावर विस्तारला आहे. अनेक कुटुंबाचे उपजिविकेचे साधन हा व्यवसाय आहे. त्यामुळे या भाजीपाला विक्रेत्यांचा अभ्यास जास्त उपयुक्त व संयुक्तिक ठरतो.

उद्दिष्टे
१. पिंपरी-चिंचवड येथील फळभाजीपाल्याच्या नियमित बाजाराचा अभ्यास करणे.
२. फळभाजीपाला व्यावसायिकांच्या उत्पन्न व खर्चाचा अभ्यास करणे.
३. सरकारने बाजारपेठांचा विकास साधण्यासाठी कोणते नियम केले आहेत याचा अभ्यास करणे.

गृहितकृत्ये
१. फळभाजीपाला बाजारांचा विकास झाल्यामुळे भाजी विक्री करणा-यांची संख्या वाढली आहे.
२. फळभाजी व्यापार केल्यामुळे या व्यावसायिकांची आर्थिक स्थिती सुधारली आहे.

संशोधन पद्धती

पिंपरी - चिंचवड परिसरातील उपनगरात अनेक फळभाजीपाला बाजारांची महानगरपालिकेद्वारे उभारणी करण्यात आली आहे. या बाजारातून ३0 फळभाजी व्यापार करणा-या विक्रेत्यांची स्तरित यादृच्छिक नमुना निवड पद्धतीद्वारे निवड केली आहे. या विक्रेत्यांची प्राथमिक माहिती संकलित केली आहे.

१९२८ साली रॉयल कमिशन ऑन ॲग्रीकल्चर ने आपल्या अहवालात शेतमालाच्या सदोष खरेदी विक्री व्यवस्थेचा सविस्तर आढावा घेतला आहे. या अहवालात त्यांनी व्यापा-यांकडून शेतक-यांच्या पिकाबाबत त्यांची जी फसवणूक होते. ज्या अनिष्ठ प्रथांचा त्यांच्याकडून अवलंब केला जातो. त्यादूर करण्यासाठी विपणन व्यवस्थेत सुधारणा सुचविल्या होत्या. त्यास अनुसरून १९३९ मध्ये जुन्या मुंबई राज्यात कृषी उत्पन्न खरेदी विक्री कायदा अंमलात आणला गेला. त्यास अनुसरून १९६७ मध्ये नियम तयार करण्यात आले. ऑक्टोबर १९८७ मध्ये या कायद्यात काही दुरूस्त्या करण्यात आल्या. त्यानुसार आज संपूर्ण महाराष्ट्रात खरेदी विक्री संघाद्वारे शेतमालाचे खरेदी विक्रीचे व्यवहार चालतात.

तालुका पातळीवर बाजार समिती स्थापन केली जाते. या बाजारसमितीत शेतकरी उत्पादक व्यापारी, आडते, हमाल, पंचायतसमिती सदस्य, कृषीखात्याचा अधिकारी यांचे प्रतिनिधी असतात. या बाजारसमितीद्वारे शेतमाल खरेदी-विक्रीचे व्यवहार मोठया प्रमाणात केले जातात. पिंपरी चिंचवड परिसरातील फळभाजी विक्रेत्यांची प्राथमिक माहिती संकलित केली असता असे दिसून आले की फळभाजी विक्रेत्यांपैकी २२ टक्के विक्रेते निरक्षर आहेत तर १0 वी पर्यंत शिक्षण घेणा-यांचे प्रमाण ४0 टक्के आहे. २१ ते ४0 वर्षे वयोगटातील विक्रेत्यांचे प्रमाण ४६ टक्के आहे तर ४0 ते ६0 वर्षे या वयोगटातील विक्रेत्यांचे प्रमाण ५४ टक्के आहे. पुरूष भाजीविक्रेत्यांचे प्रमाण ८४ टक्के आहे. तर स्त्री भाजीविक्रेत्यांचे प्रमाण १६ टक्के आहे.

तक्ता क्र. १
फळभाजी विक्रेत्यांचे धर्मानुसार वर्गीकरण

| अ.नं. | धर्म | फळभाजीपाला विक्रेत्यांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | हिंदु | १३ | ४३.३३ |
| २. | खिश्चन | 0२ | ६.६६ |
| ३. | मुस्लीम | 0६ | २0.00 |
| ४. | बौद्ध | 0९ | ३0.00 |
| | एकूण | ३0 | १00.00 |

**Please cite this Article as :** प्रा. डॉ. विकास ज. पवार, "पिंपरी चिंचवड (पुणे) येथील फळभाजीपाला बाजाराचा अव्यास" : **Golden Research Thoughts (March ; 2012)**

आधार- क्षेत्रीय पाहणी

वरील तक्त्यात पिंपरी - चिंचवड परिसरातील फळभाजी विक्रेत्यांची धर्मानुसार पाहणी दर्शविली आहे. त्यानुसार ४३.३३ टक्के विक्रेते हिंदु धर्मातील आहेत. तर ६.६६ टक्के विक्रेते खिश्चन धर्माचे आहेत. ३०.० टक्के विक्रेते बौद्ध धर्मातील आहेत आणि २०.० टक्के विक्रेते मुस्लीम धर्माचे होते.

तक्ता क्र. २

फळभाजी विक्रेत्यांचा दैनंदिन खर्च व उत्पन्न

| अ.नं. | दैनंदिन सरासरी खर्च (रूपये) | दैनंदिन सरासरी उत्पन्न (रूपये) | भाजी विक्रेत्यांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १. | १००० ते १५०० | २००० ते २५०० | १० | ३३.४ |
| २. | १५०१ ते २५०० | २५०१ ते ३७०० | १२ | ४०.० |
| ३. | २५०१ ते ३५०० | ३७०१ ते ५००० | ०८ | २६.० |
| | एकूण | | ३० | १००.०० |

आधार- क्षेत्रीय पाहणी

वरील तक्त्यामध्ये फळभाजी विक्रेत्याचा दैनंदिन फळभाजी वरील सरासरी खर्च दर्शविला आहे. या खर्चाद्वारे त्यांना मिळणारे उत्पन्न दर्शविले आहे. १००० ते १५०० रूपये दैनंदिन खर्च करणारे विक्रेते ३३.४ टक्के असुन त्यांना दैनंदिन सरासरी १००० रूपये नफा मिळतो. तर १५०१ ते २५०० रूपये दैनंदिन खर्च करणारे विक्रेते ४०.० टक्के असुन त्यांना दैनंदिन सरासरी १२०० रूपये नफा मिळतो. तर २५०१ ते ३५०० रूपये दैनंदिन खर्च करणारे विक्रेते २६.६ टक्के असुन त्यांना दैनंदिन सरासरी १३०७ रूपये नफा मिळतो. या उत्पन्नावर त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह निश्चित चांगल्या प्रकारे होत आहे.

पुणे येथील गुलटेकडी भागात ९ मे १९५४ रोजी सरकारी नियमानुसार मार्केट कमिटीची स्थापना झाली. शेतक-यांना शेतमालाची योग्य किंमत मिळवून देणे व खरेदीदारांकडून त्यांची फसवणूक टाळणे या उद्देशाने या बाजार समितीची स्थापना करण्यात आली. त्याच धर्तीवर पिंपरी-चिंचवड येथे फळभाजीपाला बाजाराचा औपचारिक प्रारंभ १९५७ साली झाला. या बाजारात १९७६ पासुन विधिनियमित बाजारपेठांचा कायदा लागु झाला. या बाजारात सुमारे २०० ते ३५० शेतकरी असुन खरेदीदार व्यापा-यांची संख्या १०० ते १५० आहे. या बाजारपेठेची जागा पिंपरी चिंचवड महापालीकेची असुन ती भाडेतत्वावर वापरली जात आहे. या बाजाराचे लक्षणीय वैशिष्टये म्हणजे शेतकरी व खरेदीदार व्यापारी या दोहोंमध्ये मध्यस्थ दलाल नसतो. तर प्रत्यक्ष व्यवहार केला जातो. त्यामुळे शेतक-यांना त्यांच्या मालाला चांगला भाव मिळतो.

पिंपरी चिंचवड फळभाजीपाला बाजारात शेतकरी व खरेदीदार वापा-यांना या बाजाराचे सभासद व्हावे लागते. या बाजाराचे व्यवस्थापन पाहण्यासाठी पर्यवेक्षक व लिपीक, शिपाई, रखवालदार असा नोकरवर्ग कार्य करतो. याशिवाय परवानाधारक तोलारी व मापाडी खरेदी विक्रीचे व्यवहार पाहतात. या बाजारामुळे भोवतालच्या ३०-४० किलोमीटर अंतरावरील शेतकरी मोठया प्रमाणात फळभाजीपाल्याचे उत्पादन करतात. त्यांना बाजार जवळ असल्यामुळे वाहतूक खर्च कमी येतो. शिवय या बाजारात शेतमालाला किंमत देखील चांगली मिळते. त्यामुळे या बाजारात उत्पादक शेतकरीवर्ग व खरेदीदार व्यापारी या दोघांमध्ये चांगले संबंध निर्माण झाले आहेत. या खरेदीदार व्यापा-यांचा संपूर्ण कुटूंबाचा उदरनिर्वाह या व्यवसायावर अवलंबून असून त्यांचा कौटुंबिक खर्च सहज या व्यवसायातून भागू शकतो. पिंपरी -चिंचवड या नगरात फळभाजीपाल्याला मागणी देखील चांगली आहे त्यामुळे या व्यापा-यांना चांगला भाव मिळून चांगले उत्पन्न मिळते.

निष्कर्ष

१.भाजीविक्रेत्यांमध्ये २१ ते ३० वर्षे वयोगटातील विक्रेत्यांचे शेकडा प्रमाण २८ टक्के एवढे आहे. तर ५१ ते ६० वर्षे या वयोगटातील विक्रेत्यांचे प्रमाण ३० टक्के दिसून आले आहे.

२.१० वी पर्यत शिक्षण असणा-या भाजी विक्रेत्यांचे प्रमाण ४० टक्के एवढे आहे. तर पदवीपर्यत शिक्षण असणा-या विक्रेत्यांचे प्रमाण २६ टक्के एवढे आहे.

३.भाजी विक्रेत्यांचे बाजारातील दरमहा उत्पन्न लक्षात घेतल्यास असे दिसून आले की, १०००० ते १२००० रूपये उत्पन्न मिळणारे भाजीविक्रेत्यांचे प्रमाण ३३.४२ टक्के होते. तर १२००१ ते १५००० रूपये उत्पन्न मिळणारे भाजी विक्रेत्यांचे प्रमाण ६६.६ टक्के एवढे आढळूण आले आहे.

४.फळभाजी खरेदीदारांमध्ये हिंदू धर्मीयांचे प्रमाण ६० टक्के एवढे होते. तर मुस्लीम धर्मीयांचे प्रमाण ८ टक्के आढळून आले आहे. बाकीचे सर्व खरेदीदार इतर सर्व धर्माचे आहेत.

सुचना

१.महानगरपालिका अधिका-यांकडून परवाना मिळविताना जी दप्तर दिरंगाई होते ती टाळून कमी वेळेत व कमी खर्चात परवाना मिळण्याची व्यवस्था झाल्यास विक्रेत्यांची संख्या वाढून ग्राहकांना योग्य वेळी रास्त भावात सेवा उपलब्ध होतील.

२.महापालिका हद्दीत जेथे भाजीमंडई साठी जागा उपलब्ध नसेल तेथे होकर्स झोन उपलब्ध केल्यास सर्व भागात फळभाजीपाला पुरवठा नियमित होऊशकेल.

**Please cite this Article as :** प्रा. डॉ. विकास ज. पवार, "पिंपरी चिंचवड (पुणे) येथील फळभाजीपाला बाजाराचा अव्यास" : **Golden Research Thoughts (March ; 2012)**

३ . भाजीमंडईमध्ये जो कचरा निर्माण होतो त्याची योग्य विल्हेवाट लावण्याची कार्यक्षम व्यवस्था पाहिजे जेणेकरून आरोग्याचा प्रश्न निर्माण होणार नाही . शिवाय ओल्या कच-यापासुन बायोगॅस प्रकल्प ग्रामीण भागात किंवा सेंद्रीय खत प्रकल्प सुरू केल्यास त्याचा फायदा होईल .

४ . भाजीमंडईच्या शेजारी ग्राहक वर्गासाठी पार्किंगची व्यवस्था असणे आवश्यक आहे . त्यामुळे वाहतुकीची कोंडी होणार नाही .

संदर्भ ग्रंथ

१ . प्रा . डॉ . ओ . वि . कडवेकर, "विपणन तत्वे व कार्यपद्धती"
२ . डॉ . प्रभाकर देशमुख, "व्यवसाय प्रशासन" विद्या प्रकाशन, नागपूर, १९७२
३ . प्रा . मो . स . गोसावी, "विक्रीय व्यवसाय - विक्रीय व्यवस्था व जाहिरातकला
४ . कृषी उत्पन्न बाजारसमितीचा वार्षिक अहवाल

**Please cite this Article as :** प्रा . डॉ . विकास ज . पवार , "पिंपरी चिंचवड (पुणे) येथील फळभाजीपाला बाजाराचा अव्यास" **: Golden Research Thoughts (March ; 2012)**